



दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १५६
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शुक्रवार, दि.१७ जानेवारी २०२५


## पुढील मकर संक्रांतीपर्यंत ठाकरे-फडणवीस एकत्र ?

### आमदार रवी राणांचा दावा



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, अमरावती :** पुढील मकरसंक्रांतीपर्यंत उद्धव ठाकरे हे देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत दिसतील, असे वक्तव्य आमदार रवी राणा यांनी केले आहे. रवी राणा यांच्या या विधानाची राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.

राज्याच्या परिवर्तनामध्ये उद्धव ठाकरेंनी सहभागी व्हावे, तिळगूळ खावे आणि गोड गोड बोलावे अशी विनंती आहे, असेही रवी राणा यांनी म्हटले आहे. युवा स्वाभिमान पक्षातर्फे रवी राणा यांच्या पुढाकाराने मंगळवारी मालखेड मार्गावरील हनुमान गढी येथे मकर संक्रांति निमित्त पतंग उत्सव ते आयोजन करण्यात आले होते.

यावेळी पत्रकारांशी बोलताना रवी राणा म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटून उद्धव ठाकरे एक पाऊल पुढे आले आहेत. पुढच्या मकरसंक्रांतीपर्यंत उद्धव ठाकरे हे देवेंद्र फडणवीसांसोबत दिसतील. पंतप्रधान नरेंद्र मोदींचे नेतृत्व उद्धव ठाकरे यांनी खुल्या मनाने स्वीकारले तर नक्कीच हे होईल. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र पुढे जाणार आहे. त्यांच्यात नेतृत्वात आगामी महापालिका निवडणुकीत भाजपा-युवा स्वाभिमान पक्ष रिंगणात उतरेल. कुठल्याही निवडणुकीत आम्ही एकत्रित राहू असेही आमदार रवी राणा यांनी सांगितले.

विधिमंडळाच्या अधिवेशनादरम्यान उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. तर आदित्य ठाकरे हे देखील आतापर्यंत तीन वेळा देवेंद्र फडणवीसांच्या भेटीसाठी गेले होते. शिवाय ठाकरे गटाच्या 'सामना'मधून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक करण्यात आले. तसेच उद्धव ठाकरे माझे शत्रू नाहीत, असे विधान फडणवीसांनी केले होते. या सर्व घडामोडींवर प्रतिक्रिया देताना रवी राणा यांनी मोठा दावा केल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

**विकासासाठी एकत्र येण्याचे आवाहन...**

राजकारणात लोकांनी दिलेला निर्णय स्वीकारला पाहिजे. अचलपूरमधून मतदारांनी भाजपचे प्रवीण तायडे हे सक्षम आमदार निवडले आहेत. प्रवीण तायडे मतदारसंघात जी काही विकासकामे करतील त्यांना बच्चू कडू यांनी पाठिंबा दिला पाहिजे, अशी आशा रवी राणा यांनी व्यक्त केली. लोकशाहीत पराभव झाल्यानंतर तो स्वीकारून सगळ्यांनी अमरावतीच्या विकासासाठी एकत्र आले पाहिजे. विरोधकांनी तिळगूळ खावे आणि गोड गोड बोलावे, विकासासाठी एकत्र यावे, असे आवाहनही रवी राणा यांनी स्थानिक राजकीय नेत्यांना केले आहे. रवी राणा यांनी याआधी बच्चू कडू यांनी चहा पिण्यासाठी यावे, असे आमंत्रण देखील दिले होते.

## कोपरखैरणे व ऐरोली विभागात अनधिकृत बांधकामावर धडक कारवाई



**अक्षराज : जे. के. पोळ**
**दि.१६, नवी मुंबई :**

महानगरपालिका अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे त्या अनधिकृत बांधकामांविरोधात नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने कोपरखैरणे व ऐरोली विभागात निष्कासनाची धडक कारवाई केली.


नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कोपरखैरणे विभागांतर्गत (१) पांडुरंग हरी पाटील/ लक्ष्मी पांडुरंग पाटील, एसएस टाईप, रूम नं ९०७, सेक्टर- ४, कोपरखैरणे, नवी मुंबई. व (२) आनंदा सखाराम भिलारे, एसएस टाईप, रूम नं ९३२, सेक्टर- ४, कोपरखैरणे, नवी मुंबई यांच्या बांधकामांस महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीस बजावण्यात आली होती. त्यांच्या बांधकामावर तोडक कारवाई करण्यात आली.

तसेच कोपरखैरणे, सेक्टर १ येथील फ्लायओव्हर खालील व कोपरखैरणे रेल्वे स्टेशनच्या अंडरपास ब्रिजच्या खालील बेघर लोकांचे सामान डम्पींगच्या ठिकाणी जमा करण्यात आले. या मोहीमेत एकूण ३२ झोपड्या निष्कासित करण्यात आल्या.

या अनधिकृत बांधकामावर कोपरखैरणे विभागामार्फत तोडक मोहीमेचे आयोजन करण्यात आलेले होते. या धडक मोहिमेसाठी कोपरखैरणे विभागाचे सहा.आयुक्त सुनिल काठोळे, कनिष्ठ अभियंता चंद्रकांत धोत्रे व इतर अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

त्याचप्रमाणे नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ऐरोली विभागांतर्गत घर क्र. १५२९ ते १५३२, से-१/ए, ऐरोली येथील आरसीसी इमारतीचे बांधकाम नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे सुरु केले होते. सदरचे अनधिकृत बांधकाम आज दिनांक १४ जानेवारी २०२५ रोजी अतिक्रमण मोहिम राबवून अंशत: निष्कासित करण्यात आले आहे. या धडक मोहिमेसाठी जी विभाग ऐरोलीचे सहाय्यक आयुक्त डॉ. अंकुश जाधव, कनिष्ठ अभियंता संदीप म्हात्रे व अतिक्रमण विभागाचे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

## स्वत:वर गोळी झाडून पोलीस हवालदाराची आत्महत्या



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, गोंदिया :** गोंदिया जिल्ह्यातील नवेगावबांध जवळील सशस्त्र दूरस्थ क्षेत्र धाबेपवणी येथील एका पोलीस हवालदाराने स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केली. ही धक्कादायक घटना गुरूवारी (१६ जानेवारी) दुपारच्या सुमारास घडली. जयराम कारू कोरेट (५०, रा. संबूटोला/कडीकसा ता. देवरी, जि. गोंदिया) बक्कल क्रमांक २४ असे आत्महत्या केलेल्या पोलिस हवालदाराचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार नुकताच जयराम कारू कोरेट यांचे स्थानांतरण झाल्यामुळे आत्महत्या केली असावी, असा अंदाज त्याच्या मित्र मंडळी कडून मिळालेल्या माहिती वरून व्यक्त केला जात आहे. पण, पोलिस विभागाकडून सध्या आत्महत्येचे कारण गुलदस्तातच आहे.


गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोरगांव तालुक्यातील संवेदनशील नक्षलग्रस्त भागामध्ये नक्षल गतीविधी वर नजर ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणात सशस्त्र दूरस्थ क्षेत्र (एओपी) बांधण्यात आल्या आहे. अशातच अर्जुनी मोरगाव तालुक्यातील नवेगावबांध पोलीस स्टेशन जवळ असलेल्या धाबेपवनी येथील एओपी मधील पोलिस हवालदार पदावर कार्यरत जयराम कारू कोरेट यांनी आत्महत्या केल्याने एकच खडबड उडाली आहे. त्यांनी आपल्याजवळ असलेल्या एके४७ या बंदूकीने गोळी झाडत आत्महत्या केली. या घटनेचा तपास नवेगावबांध पोलिस स्टेशनच्या पोलिस निरीक्षक योगिता चापले ह्या करीत आहे. विशेष बाब म्हणजे गोंदिया जिल्ह्यात मागील दोन महिन्यात पोलिस कर्मचाऱ्यांनी स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केल्याची ही दुसरी घटना आहे. नोव्हेंबर २०२४ ला गोंदियातील बिर्सी विमानतळावर कर्तव्यावर असलेल्या पोलिस शिपाई राकेश भांडारकर (रा. पदमपुर, ता. आमगाव) यांनी कर्तव्यावर असताना स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केल्याची घटना घडली होती. घटनेनंतर त्यांच्या पत्नी यांनी कर्तव्यावर असताना विभागातील वरिष्ठ अधिकारी विनाकारण त्रास देत असल्याचा आरोप केला होता. राकेश कर्तव्यावर असताना त्यांच्यासोबत घडत असलेले प्रसंग सांगत असल्याचेही त्यांनी सांगितले होते. गुरूवारी जयराम कोरेट यांच्या आत्महत्येची घटना घडली. या प्रकरणाचा तपास नवेगावबांधच्या पोलिस निरीक्षक योगिता चाफले यांच्या मार्गदर्शनात सुरू आहे. त्यात तपास अंती खरे कारण काय ते स्पष्ट होणार आहे.

## बिलोलीत 'जिओ नेट' चा खेळ खंडोबा... ग्रहाक वैतागले !

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१६, नांदेड :** बिलोली शहरात जिओ कंपनीच्या मोबाईल नेटवर्कचा सातत्याने खेळ खंडोबा होत असल्याने ग्राहक मात्र वैतागले असुन कंपनीच्या ठिसाळ नियोजना विरोधात संताप व्यक्त करत आहेत. शहरात गेल्या अनेक महिन्यांपासून जिओ मोबाईल कंपनीची नेटवर्किंग सेवा विजेवरच अवलंबुन असल्याने नैसर्गिक अपत्ती असो या कुठलीही विज पुरवठ्याची समस्या निर्माण झालेली असेल अशा परस्थितीत जो पर्यंत विज पुरवठा सुरळीत होणार नाही तो पर्यंत मोबाइलची नेट्वर्किंग सेवा बंदच रहात असल्याने सध्याचे जनजिवन हे मोबाईलवर अवलंबुन असल्याने ग्राहकांना अनेक वेगवेगळ्या समस्यांना सामोरे जावे लागत असुन बिलोली शहरांसह तालुक्यांतील ही जिओ नेटवर्कींग सेवा तात्काळ सुरळीत नाही झाल्यास अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समितीच्या वतिने व ग्राहकांच्या वतिने येत्या कांहीं दिवसांत विविध मार्गानें तिव्र आंदोलन छेडण्याचा इशारा राष्ट्रीय सरचिटणीस राजु पाटील शिंपाळकर जिल्हाध्यक्ष शंकरराव मावलगे सामाजिक कार्यकर्ता सय्यद रियाज यानी आमच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले.

## ठाण्यातील धोकादायक इमारतीचा पुनर्विकासाचा मार्ग मोकळा होणार



**अक्षराज : तानाजी ताकतोडे**

**दि.१६, ठाणे :** ठाणे शहरातील धोकादायक इमारतींचा पुनर्विकास जलद गतीने व्हावा व नागरिकांना मालकी हक्कांचे घरे उपलब्ध व्हावे यासाठी ठाण्यातील काही विकासकांनी खासदार नरेश म्हस्के यांना निवेदन सादर केले.

दि.१५ जानेवारी २०२५ रोजी महापालिका आयुक्त सौरभ राव यांची भेट घेऊन खासदार नरेश म्हस्के यांनी ठाण्यातील धोकादायक इमारतींच्या पुनर्विकास मंजुरी संदर्भात येणाऱ्या अडचणींबाबत चर्चा करण्यात आली.यामध्ये अतिरिक्त मनुष्यबळासह आवश्यक असलेल्या सर्व बाबींची मंजुरी देण्याबाबत आयुक्तांनी सकारात्मक भूमिका घेतली व आत्ता ठाण्यातील धोकादायक इमारतीचा पुनर्विकासाचा मार्ग मोकळा होणार आहे .

इमारतीच्या पुनर्विकासाचा प्रश्न हा नागरिकांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. विकास प्रस्तावा अंतर्गत येणारे रस्ते व प्रॉपर्टी कार्ड हस्तांतरणा बाबतही यावेळी चर्चा करण्यात आली.याबाबतचे शुल्क विकासकांकडून घेतल्यानंतर याबाबतची कार्यवाही महापालिका स्वतः करेल असा निर्णय आयुक्तांनी घेतला असून त्यामुळे विकासकांना दिलासा मिळणार आहे. पुनर्विकासाचे काम जलद गतीने व्हावे यापुढे यु डी सी पी आर २०२० मध्ये नमूद केलेल्या तरतुदीनुसार ठाणे शहरातील विकासाची संयुक्त समिती गठित करणेबाबतचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

तसेच प्रस्तावित भूखंडामध्ये डी पी रोड साठी जागा बाधित होत असेल तर यासाठीचा डी आर सदरच्या इमारती वापरण्यासाठी परवानगी मिळावी. याबाबतची ही चर्चा देखील बैठकीत करण्यात आली,जर डी आर चा विकास प्रस्तावात वापरला जाणारा असेल तर त्याला त्वरित परवानगी देण्यात यावी असेही आयुक्तांनी नमूद केले.तसेच ड्रेनेज,पाणी,उद्यान या आवश्यक बाबींसाठी लागणारा ना-हरकत दाखला एक खिडकी योजना अंतर्गत देण्यात यावा अशी सूचना आयुक्त राव यांनी यावेळी दिली.

ठाणे शहरातील जीर्ण इमारतीचा पुनर्विकास विना विलंब व जलद गतीने व्हावा यासाठी आज झालेल्या बैठकीत आयुक्त सैराभ राव यांच्या समवेत शिष्टमंडळासह खासदार नरेश म्हस्के यांनी सविस्तर चर्चा केली .शहरातील जुन्या इमारतीमध्ये अल्प व मध्यम उत्पन्न गटातील सर्वसामान्य कुटुंबे राहत आहेत. या नागरिकांना पुनर्विकासामध्ये मोफत घरे दिली जावेत यासाठी संबंधित विकासाला कमीत कमी नफ्यामध्ये सदरचे काम करावे लागते त्यामुळे या पुनर्विकासासाठी सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या अटी जाचक असल्याने बहुतांश प्रकल्प मार्गी लागत नाही. त्यामुळे याबाबत काही अटीमध्ये शिथिलता देणे गरजेचे आहे. या बैठकीत आयुक्तांनी सकारात्मक भूमिका घेऊन शहर विकास विभागास आदेश दिले आहेत. त्यामुळे आता धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रश्न जलद गतीने मार्गी लागणारअसल्याचा विश्वास खासदार नरेश म्हस्के यांनी यावेळी व्यक्त केला व आयुक्तांचे चे आभार मानले.यावेळी ठाण्यातील ठाणे शहर पुनर्विकास समितीचे सर्व मुख्य विकासकांनी ठाणे शहरातील जीर्ण इमारतींचा रखडलेला पुनर्विकासाचा मार्ग मोकळा केल्याबद्दल खासदार नरेश म्हस्के यांचे आभार मानले.

यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे,सहाय्यक संचालक नगर रचना संग्राम कानडे, उपनगर अभियंता सुनील पाटील, कार्यकारी अभियंता महेश रावळ, रविशंकर शिंदे, संगीता सामंत, ठाणे शहर पुनर्विकास समिती टी सी आर ए विद्याधर वैशपायन, महेश बोरकर, जतीन शहा, सुमेध पाटकर, सचिन भोसले, आशुतोष मस्के, आदित्य वैशपायन, ऋषिकेश दंडे, सचिन म्हात्रे, उमंग सावला आदी उपस्थित होते.

## राष्ट्रीय महामार्ग झालाय मृत्युचा सापळा ! अपघात स्थळांच्या दुरुस्ती साठी राष्ट्रीय महामार्ग विभाग उदासीन

**अक्षराज : प्रमोद मौळे**

**दि.१६, जव्हार (पालघर) :** पालघर-जव्हार-त्र्यंबकेश्वर- घोटी-सिन्नर हा रस्ता हा राष्ट्रीय महामार्ग असुन, या रस्त्यावरील अनेक धोकादायक वळणांवर अजूनही कोणत्याही प्रकारची सुरक्षा प्रणाली कार्यान्वित करण्यात आली नसल्याचे दिसून येत आहे. काही ठिकाणी वळण असणाऱ्या भागामध्ये महामार्ग लगत असणारी जागा खचल्याने त्या ठिकाणी चालकांना सावध करण्यासाठी चक्क दगडी अडथळे ठेवण्यात आले आहेत. त्यामुळे हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग आहे की मृत्यूचा सापळा असा सवाल उपस्थित होत आहे.

पालघर जिल्ह्याच्या निर्मितीनंतर तत्कालीन पालकमंत्री दिवंगत विष्णू सवरा यांच्या प्रयत्नाने पालघर-जव्हार-त्र्यंबकेश्वर- घोटी- सिन्नर या मार्गाचे राष्ट्रीय महामार्गामध्ये रूपांतर करण्यात आले. सध्या हा १६० अ क्रमांकाचा महामार्ग सात मीटर रुंद असून राष्ट्रीय महामार्गाच्या मानकाप्रमाणे अनेक ठिकाणी दीड मीटरची साईड पट्टी अस्तित्वात नाही. विक्रमगड ते जव्हार, जव्हार ते मोखाडा तसेच मोखाडा ते त्र्यंबकेश्वर या भागात अनेक धोकादायक वळण व अपघात प्रवण क्षेत्र असून अशा ठिकाणी चालकांना सावध करण्यासाठी आगाऊ सूचनाफलक तसेच धोकादायक ठिकाणी क्रॅश कार्ड, रिफ्लेक्टर, रंबलर इत्यादी उभारण्यात आली नाहीत. त्यामुळे या मार्गावर अनेकदा अपघात होताना दिसून येत आहेत.

विक्रमगड ते जव्हार या मार्गावर कशिवली घाटात अनेक ठिकाणी रस्त्याच्या संरक्षक भिंती तुटल्या त्या ठिकाणी मातीचा भराव टाकला आहे . काही ठिकाणी महामार्गालगतचा भाग खचला असून अशा खचलेल्या भागात वाहन पडून मोठे अपघात वा दुर्घटना होण्याची शक्यता आहे. धोकादायक ठिकाणी कोणत्याही प्रकारची दुरुस्ती करण्यात आली नाही.राष्टीय महामार्ग विभागाने आज तागायत कशिवली घाटातील संरक्षण भिंती बांधलेल्या नाहीत. विशेष म्हणजे विक्रमगड - जव्हार रस्त्यावर गेल्या २५ वर्षांपूर्वी बांधलेल्या कमी उंचीच्या पाईप मोर्या, लहान पुल आहेत. दर वर्षी पावसाळ्यात जास्त पाऊस पडल्यानंतर या ठिकाणी पाणी साचते व पाणी ओसरेपर्यंत वाहातुकीचा खोळंबा होतो.असे असताना या कमी उंचीच्या मोर्या,लहान पुल बांधण्यात आलेले नाहीत. जव्हार ते त्र्यंबकेश्वर या महामार्गावर अनेक धोकादायक वळणे असताना त्या ठिकाणी कोणतेही सुचेना फलक नाहीत .तसेच कुंडाचा पाडा येथे अत्यंत धोकादायक वळण आहे हे वळन दुरुस्ती करण्यासाठी १८ वर्षांपूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाने या ठिकाणी नाल्यावर पाईप डिप बांधुन खडीकरणाचा रस्ता केलेला आहे मात्र ह्या खडीकरणाच्या रस्त्यावर डांबरीकरण झालेले नाही.त्यामुळे तिव्र धोकादायक वळनावर अनेक अपघात होत आहेत. या भागात असणाऱ्या अनेक अपघात प्रवण क्षेत्रात कोणत्याही आगाऊ सूचना नसल्याने अनेकदा अपघात होताना दिसून येतात. तसेच रस्त्याच्या दुतर्फा वाढलेल्या झाडी - झुडपामुळे वळनावरील येणार्या गाड्या दिसत नसल्यामुळे देखील अपघात होतात,विशेष म्हणजे राष्ट्रीय महामार्ग असणाऱ्या या भागात सुरक्षिततेकडे दुर्लक्ष होत असल्याने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला या रस्त्याची देखभाल दुरुस्ती कडे लक्ष देण्यास पुरेसे मनुष्यबळ किंवा इच्छाशक्ती नसल्याने या रस्त्याला पुन्हा राज्य मार्ग म्हणून घोषित करावा अशी नागरिकांकडून मागणी केली जात आहे.

# संपादकीय



## महाराष्ट्र फिल्म कंपनी स्थापनकर्ते

बाबूराव पेंटर हे प्रसिद्ध महाराष्ट्रीय चित्रकार, शिल्पकार आणि चित्रपट-निर्माते व दिग्दर्शक होते. त्यांचे पूर्णनाव बाबूराव कृष्णाजी मेस्त्री-मिस्त्री असे होते. त्यांचा जन्म दि.३ जून १८९० रोजी कोल्हापूर येथे झाला. त्यांचे वडील सुतारकाम, लोहारकाम करीत. बाबूरावांचा लौकिक चित्रकार म्हणून असला, तरी त्यांना खरीखुरी कीर्ती लाभली ती त्यांनी केलेल्या चित्रपटक्षेत्रातील कामगिरीमुळे. आपले आतेभाऊ आनंदराव मेस्त्री यांच्या मदतीने त्यांनी डेक्कन सिनेमा सुरू केला होता, पण तो लवकरच बंद पडला, त्यानंतर १९१३ मध्ये त्या दोघांनी बाबूराव रूईकर यांच्यासह महाराष्ट्र सिनेमा ह्या चित्रपट निर्मितिसंस्थेची निर्मिती केली; ती बंद करून पुढे १ डिसेंबर १९१७ रोजी आपल्या बंधूंच्या स्मरणार्थ बाबूरावांनी महाराष्ट्र फिल्म कंपनी ची स्थापना केली आणि १९१९ मध्ये सैरंध्री या आपल्या कलात्मक म ूकपटाची निर्मिती केली. कल्पकता, भव्यता, स्त्रियांनीच केलेल्या स्त्री भूमिका आणि पौराणिक काळातील राजवैभवाचे दर्शन हे या चित्रपटाचे वैशिष्ट्य होते. ७ फेब्रुवारी १९२० रोजी पुण्याच्या आर्यन सिनेमागृहात सैरंध्री प्रदर्शित झाला व लो. टिळकांनी हा चित्रपट पहिला दि.८ फेब्रुवारी १९२० रोजी. त्यांनी बाबूरावांना सिनेमा केसरी या उपाधीने गौरविले. महाराष्ट्र फिल्म कंपनीद्वारा बाबूरावांनी १९२०-३० या दशकात एकूण १७ चित्रपटांची निर्मिती केली. त्यांपैकी वत्सलाहरण-१९२१ व भक्त प्रल्हाद-१९२६ हे पौराणिक, तर सिंहगड-१९२३, कल्याण खजिना-१९२४, सती पद्मिनी-१९२४ व शहाला शह-१९२५ हे ऐतिहासिक आणि सावकारी पाश-१९२५ हा सामाजिक कथानकावरील वास्तववादी चित्रपट होय. सिंहगड हा त्यांचा चित्रपट अनेक दृष्टींनी महत्त्वपूर्ण ठरला. त्यातील रात्रीच्या लढाईचे चित्रिकरण त्याकाळी त्यांनी प्रज्योत दिव्याच्या- आर्क लँप प्रकाशझोतात केले. विजेच्या प्रकाशात चित्रिकरण केलेला हा पहिला भारतीय चित्रपट होय. पन्हाळा किल्ल्याच्या परिसरात केलेल्या चित्रिकरणामुळे तो बाह्यचित्रिकरणाच्या दृष्टीनेही पहिलाच चित्रपट ठरतो. याच चित्रपटाच्या वेळी मुंबईला प्रेक्षकांची अलोट गर्दी लोटल्यामुळे तिचे नियंत्रण सरकारला करावे लागले. तेव्हापासून सरकारचे लक्ष चित्रपटाकडे वेधले गेले व या चित्रपटापासूनच करमणूक कर बसविण्यात आला. या चित्रपटाच्या जाहिरातीसाठी बाबूरावांनी शिलामुद्रण केलेली ३.४८ ु ६.९६ मीटर- १० ु २० फूट लांबी-रुंदीची भित्तिपत्रके तयार केली होती. ती चांगलीच प्रभावी ठरली. त्या दृष्टीनेही चित्रपटांच्या भित्तिपत्रकांचे जनकत्व बाबूरावांकडे जाते. त्यांच्या सैरंध्री या चित्रपटातील कीचकवधाचे दृश्य परिणामकारक होते, ते पाहून काही प्रेक्षक मूर्च्छित पडले. तेव्हापासून सरकारने चित्रपटांच्या अभ्यवेक्षणास सुरुवात केली. कल्याण खजिना, सती पद्मिनी व सिंहगड या त्यांच्या मूकपटांना यूरोपमधील वेम्बले येथील चित्रपटप्रदर्शनात सुवर्णपदके लाभली.

वत्सलाहरणाच्या निर्मितीनंतर त्यांनी म ार्कंडेयाचे चित्रीकरण सुरू केले, परंतु ६ नोव्हेंबर १९२२ रोजी चित्रीकरणाच्या वेळी चित्रपट निर्मितिगृहाला एकाएकी आग लागली. तथापि त्या संकटातूनही त्यांनी आपला चित्रपटसंसार उभा केला व चित्रपटनिर्मिती सुरू ठेवली. त्याकाळी महाराष्ट्र फिल्म कंपनी ही एक अग्रगण्य चित्रपटसंस्था मानली जाई. चित्रपटातील कथानकाच्या दृष्टीने कालोचित ठरणारी वेशभूषा व वातावरणनिर्मिती करण्याची बाबूरावांची हातोटी होती. त्यांचा मुख्य भर बाह्य नेपथ्यापेक्षा अभिनयावर अधिक असे.

बाबूराव आपल्या चित्रपटांतून मराठ्यांच्या तेजस्वी इतिहासाचे चित्रण आपले कलाकौशल्य पणाला लावून करीत. सैरंध्री चित्रपटापासूनच बाबूरावांनी चित्रपटाच्या कथानकाची माहिती देणाऱ्या इंग्रजी, मराठी, हिंदी व गुजराती या भाषांतील सचित्र पुस्तिका प्रकाशित करण्याचा उपक्रम सुरू केला होता. त्यांनी तयार केलेली चित्रपटांची भित्तिपत्रके आणि जाहिरातींचे फलक - पोस्टर व बॅनर यांमध्ये कलात्मकता असे. त्यांच्या एका मूकचित्रपटाच्या जलरंगातील जाहिरातींच्या दृश्यमांडणीचा जे.जे.स्कूल ऑफ आर्टचे तत्कालीन प्राचार्य सॉलोमन यांनी गौरव केला होता.

बाबूरावांना चित्रपटापेक्षा चित्रकलेत अधिक स्वारस्य होते, तसेच त्यांच्या चित्रपटनिर्मितीत व्यावसायिक दृष्टी फारशी नसल्यामुळे त्यांचे सहकाऱ्यांशी मतभेद झाले व त्यांपैकी काहीजण कंपनीतून बाहेर पडले. पुढे बाबूरावांनी लंका-१९३० या चित्रपटानंतर आणखी तीन चित्रपटांची निर्मिती केली. त्यानंतर मात्र महाराष्ट्र फिल्म कंपनी कायमचीच बंद झाली.

बोलपटाचे युग सुरू झाल्यावर कोल्हापूरच्या ''शालिनी सिनेटोन'' या संस्थेला बाबूरावांनी सहकार्य दिले व तिच्याद्वारे निर्माण झालेला उषा, सावकारी पाश-१९३५ व प्रतिमा तसेच साध्वी मीराबाई-१९३७, रुक्मिणी स्वयंवर-१९४६, लोकशाहीर रामजोशी-१९४७ व विश्वामित्र-१९५२ या बोलपटांचेही त्यांनी दिग्दर्शन केले.

भारतीय चित्रपटसृष्टीचा पाया दादासाहेब फाळके यांनी घातला आणि बाबूरावांनी त्याला कलात्मक शिस्त व सौंदर्य प्राप्त करून देवून पुढचे पाउल टाकले. त्यांच्याच तालमीत तयार झालेले व्ही.शांताराम, एस्.फत्तेलाल, विष्णुपंत दामले व केशवराव धायबर यांनी तो वारसा पुढे चालविला.

# महाराष्ट्राचा विवेकी आवाज ; प्रा.डॉ.एन.डी.पाटील



फुले, शाहू, आंबेडकरी विचारांचा पुरोगामी वारसा चालवणारे सत्यशोधक विचारवंत प्रा डॉ एन डी पाटील यांचा आज तिसरा स्मृतिदिन. तीन वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे १७ जानेवारी २०२२ रोजी प्रा डॉ एन डी पाटील यांचे निधन झाले होते. प्रा डॉ एन डी पाटील यांचे पूर्ण नाव नारायण ज्ञानदेव पाटील असे असून त्यांचा जन्म १५ जुलै १९२९ रोजी सांगली जिल्ह्यातील नागाव मधील ढवळी येथे एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी पुणे विद्यापीठातून अर्थशास्त्रातून एम ए आणि एल एल बी चे शिक्षण घेतले.

प्रा डॉ एन डी पाटील यांनी १९५४ ते १९५७ या कालावधीत सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये अध्यापनाचे कार्य केले. याशिवाय त्यांनी कमवा आणि शिका योजनेचे रेक्टर म्हणूनही काम पाहिले. १९६० साली ते इस्लामपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजचे प्राचार्य म्हणून रुजू झाले. त्यांच्यावर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. कर्मवीरांच्या विचारातून प्रेरणा घेऊनच त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. शिवाजी विद्यापीठाचे पहिले सल्लागार म्हणूनही त्यांनी काम पाहिले. ( १९६२ ) त्यानंतर शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी १९७६ ते १९७८ या कालावधीत शिवाजी विद्यापीठात समाजशास्त्र विभागाचे डीन म्हणूनही काम पाहिले. याचबरोबर १९९१ साली त्यांनी महाराष्ट्र राज्य शिक्षण आयोगाचे सदस्य म्हणून काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील हे १९५९ पासून रयत शिक्षण संस्थेचे कौन्सिल मॅनेजमेंट सदस्य म्हणून कार्यरत होते. १९९० साली रयत शिक्षण संस्थेच्या चेअरमनपदी त्यांची नियुक्ती झाली. प्रा डॉ एन डी पाटील यांनी शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कार्य कर्तुत्वाचा आगळा वेगळा ठसा उमटवला.

शैक्षणिक क्षेत्राप्रमाणेच राजकीय क्षेत्रातही त्यांनी आपल्या कार्य कर्तुत्वाने वेगळा ठसा उमटवला. १९४८ साली त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. त्यानंतर १९५७ साली त्यांनी मुंबईतील गिरणी कामगारांच्या संघटनेचे सरचिटणीस म्हणून काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी महाराष्ट्राच्या विधान परिषदेत १८ वर्ष सदस्य म्हणून काम केले. १९७८ ते १९८० या काळात ते महाराष्ट्राचे सहकार मंत्री होते. १९८५ साली ते कोल्हापूर मतदार संघातून विधानसभेचे सदस्य म्हणूनही निवडून गेले. १९९९ ते २००२ या काळात ते लोकशाही आघाडी सरकारचे निमंत्रक होते.

आपले आयुष्य समाज कार्यासाठी घालवणाऱ्या प्रा डॉ एन डी पाटील यांना पुरस्काराने गौरविण्यात आले. अनेक विद्यापीठाने त्यांना मानाची डि. लिट पदवी देऊन गौरवले.

प्रा डॉ एन डी पाटील यांनी अनेक विषयांवर सखोल लेखन केले. शेती जमिनीवरील कमाल मर्यादा आणि महाराष्ट्र सरकारचा प्रतिगामी कायदा, समाज विकास योजनेचे वस्त्रहरण, वाढती महागाई आणि ग्राहकांची ससेहोलपट, काँग्रेस सरकार आणि शेतकऱ्यांची लूट, शेतीमालाला किफायतशीर किंमतीची हमी आणि घाऊक व्यापाराचे राष्ट्रीयकरण, महाराष्ट्र सरकारच्या श्वेतपत्रिकेचे कृष्णस्वरूप, शेवटी हे शिक्षण आहे तरी कोणासाठी?, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ही त्यांनी लिहिलेले पुस्तके गाजली.

प्रा डॉ एन डी पाटील यांनी अंधश्रद्धा निर्मूलन क्षेत्रातही काम केले. त्यांची मते ठाम होती. महाराष्ट्राच्या गेल्या सत्तर वर्षांच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासात प्रा. डॉ एन डी पाटील हे एक धडाडिचे आणि लढाऊ नेते म्हणून ओळखले जातात. प्रा डॉ एन डी पाटील म्हणजे महाराष्ट्राचा विवेक आवाज. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राचा पुरोगामी आवाज हरपला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या पुरोगामी चळवळीची मोठी हानी झाली. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# महाराष्ट्र पोलीस रेझिंग डे सप्ताह अंतर्गत मोफत महाआरोग्य तपासणी शिबिर संपन्न

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१५, अलिबाग (रायगड) :** निहार प्रॉपर्टी अँड लीगल सोल्युशन, लायन्स क्लब श्रीबाग सेन्टेनिअल, स्वरांकिता अकॅडमी, जिल्हा सामान्य रुग्णालय, माणुसकी प्रतिष्ठान, दोस्त मुंबईतील प्रसिद्ध डॉ जावडे व प्रिझम सामाजिक विकास संस्था अलिबाग यांच्या माध्यमातून पोलीस रेझिंग डे सप्ताह अंतर्गत जंजिरा सभागृह पोलीस मुख्यालय, अलिबाग या ठिकाणी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अलिबाग पोलीस निरीक्षक किशोर साळे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली व ऍड निहा अनिस राऊत यांच्या प्रमुख नेतृत्वाखाली मोफत महाआरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये गर्भाशय कॅन्सर, नेत्ररोग, अस्थिरोग, पोटाचे विकार, रक्त तपासणी, ई सि जी यांसह मोफत औषधोपचार करण्यात आले.

या कार्यक्रमास प्रमुख मान्यवर म्हणून जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, डॉ. राहुल शम ा, अडिशनल एसपी अभिजित शिवथरे, होम डी वाय एस पी, अलिबाग पोलीस निरीक्षक किशोर



साळे, निहार प्रॉपर्टी अँड लीगल सोल्युशन डॉ. ॲड. निहा राऊत, स्वरांकिता अकॅडमी कला पाटील, माणुसकी प्रतिष्ठान अध्यक्ष डॉ. राजाराम हूलवान, स्त्रीरोग तज्ञ डॉ. मेघा घाटे, सिव्हिल हॉस्पिटल डॉ. अंबादास देवमाने यांची टीम डॉ. करण वाघमारे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन करून झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पोलीस निरीक्षक किशोर साळे यांनी केले तर जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी या आरोग्य तपासणी शिबिराला शुभेच्छा देत रेझिंग डे सप्ताहा विषयी माहिती दिली. ॲड. निहा राऊत यांनी या तपासणी शिबिरात सहभागी झालेल्या नागरिकांना बहुमोल मार्गदर्शन केले. साधारण २०० नागरिक व पोलीस यांनी या शिबिराचा लाभ घेतला.

## हल्ला..

सणसणाटीबातम्या
सेलिब्रिटींवर हल्ला
काय हो झाले कसे
सर्वत्र एकचं कल्ला

सांगा सगळे रंगवून
अफवांचे दहीभल्ला
कुस्ती साठी निमित्त
कारण लाभे मल्ला

राजकारणकरायला
झकास मार्ग खुल्ला
मनसोक्त करा टिका
भरून घ्यावा गल्ला

पुन्हा एकदा सिद्ध हे
सुरक्षीतनाही किल्ला
कुणा वरती बसवावा
ठरे संशयाचा बिल्ला

शोधून कधी काढालं
मागचाकोण रे दल्ला
एवढे मात्र स्पष्ट होते
गुन्हा होतो गबदुल्ला

विवाह माझा होई का
सजून बसलायं दुल्हा
पेव फुटते प्रबोधनाचे
द्यावा अनाहूत सल्ला

जमू लागती मैफिली
बडवत राहती तबला
घोडे बाजार उसळला
भरगच्चभरला तबेला

निदर्शने मोर्चे काढले
हादरून गेलामोहल्ला
कळणारं ना गोंधळात
परदेशांत गेला पिल्ला

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# कुंकूचे महत्व जाणा !



नुकताच मकर संक्रांत सण पार पाडला. त्यानंतर आता सर्वत्र हळदी कुंकू समारंभ साजरे केले जात आहेत. रथसप्तमी पर्यंत चालणाऱ्या या उत्सव काळात सर्वत्रच्या स्त्रिया उत्साहाने सहभागी होतात. विविध महिला मंडळे, सामाजिक संघटना, स्वयंसेवी संस्था यांसह राजकीय पक्षांच्या वतीने हळदी कुंकू समारंभ साजरे केले जातात.

त्यानिमित्ताने स्त्रियांचे संघटन पाहायला मिळते. यावेळी स्त्रियांना तिळगुळ वाटपासह वाण म्हणून काहीनाकाही वस्तू दिली जाते. या सर्वांत प्रमुख कृती असते ती हळद आणि कुंकू लावण्याची. सौभाग्याचे आणि समृद्धीचे प्रतीक म्हणून कपाळी हळद आणि कुंकू लावले जाते. स्त्रियांच्या दोन भुवयांमध्ये आज्ञाचक्राच्या स्थानी लावले जाणारे हळद कुंकू श्रद्धने लावले जाते. प्रत्येक स्त्रीमध्ये दुर्गादेवीचे तत्व असते त्यामुळेच स्त्रीला शक्ती असेही म्हणतात. स्त्रिया एकमेकींना हळद कुंकू लावतात म्हणजे एकमेकांतील दुर्गादेवीच्या तत्वाचे पूजन करतात. संपूर्ण चेहऱ्याच्या संवेदनांसाठी जबाबदार असणारा मज्जातंतू हा याच भागात असतो. दोन भुवयांच्या मध्यभागी मज्जातंतूच्या एकूण तीन शाखा असतात. या जागेवर दाब पडल्याने सायनसचा त्रास कमी होतो.

डोळ्यांच्या महत्त्वाच्या नसा देखील याच भागात असतात आणि या नसा डोळ्यांच्या स्नायुंशी जोडलेल्या असतात. या ठिकाणी थोडासा दाब दिल्यास दृष्टीही चांगली राहते आणि डोळ्यांचे आरोग्य सुधारते. माणसाच्या मनावर ताण आला कि कपाळावर आठ्या पडतात. शरीरातला सगळ्या गोष्टींचा ताण हा कपाळावरील त्या बिंदूच्या ठिकाणी जमा होतो. म्हणूनच त्या बिंदूला थोडीशी उत्तेजना दिल्यास आपला ताण कमी होतो, दृष्टी सुधारते आणि निद्रानाशही कमी होतो. त्यामुळे बिंदूदाबन, योगशास्त्रदृष्ट्या आणि आध्यात्मिकदृष्ट्याही कुंकू लावण्याचे अनेक लाभ आहेत. हळद आणि चुना किंवा हळद आणि लिंबू यांच्या मिश्रणतून कुंकू बनवले जाते. त्यामुळे कपाळी कुंकू लावण्याचे आयुर्वेदिक लाभही आहेत. या सर्वांमुळे भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रियांसह पुरुषांनीही कपाळाला कुंकू लावण्याची प्रथा पूर्वापार चालत आली आहे. आधुनिकतेच्या नावाखाली पूर्वापार चालत आलेल्या लाभदायक प्रथा हळूहळू लोप पावत चालल्या असून जसे हल्लीच्या स्त्रिया साडी केवळ सांस्कृतिक कार्यक्रमांना नेसतात तसे कुंकूही केवळ हळदी कुंकू समारंभातच लावू लागल्या आहेत.

कुंकूची जागा आता टिकलीने घेतली असून हळूहळू तिही नष्ट होण्याच्या मार्गांवर आहे. हल्लीच्या स्त्रियांवर हिंदी चित्रपटातील अभिनेत्रीनचा प्रभाव अधिक असल्याने आज अनेक स्त्रिया उजाड माथ्याने वावरताना दिसतात. काहीजनी टिकली लावली तरी ती दुर्बीणीने शोधावी लागेल अशा आकाराची लावतात. आपल्या हिंदु प्रथा परंपरा या मानवाचे सर्वांगीण हित साधणाऱ्या असून त्या सर्वांमागे शास्त्र दडलेले आहे. आज ते विज्ञानाच्या आधारावरही सिद्ध होत आहे.

त्यामुळे पाश्चात्य संस्कृतीच्या आहारी जाऊन त्यांना त्यागण्यापेक्षा त्यांचा अवलंब करणे हिताचे आहे. हळदी कुंकू साजरी करण्याच्या प्रथेतील व्यापक दृष्टिकोन लक्षात घेऊन स्त्रियांनी प्रतिदिन कपाळावर कुंकू लावण्याची सवय स्वतःला लावून घायला हवी.

**सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

# शिरवळच्या रयत इंग्लिश मिडीयम स्कुल प्रांगणात भरला बालबजार

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१६, शिरवळ (सातारा) :** रयत शिक्षण संस्थेच्या रयत इंग्लिश मीडियम स्कूल शिरवळच्या प्रांगणामध्ये बालचमूंच्या बाल बाजार,खाद्यपदार्थांची मेजवानी, तसेच मनोरंजनात्मक खेळांचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते.

यासाठी पंचायत समितीचे माजी अध्यक्ष राजेंद्र आण्णा तांबे, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य आप्पासाहेब देशमुख, शिरवळ गावचे सरपंच रविराज दुधगावकर, शिरवळच्या माजी सरपंच छायाताई जाधव, ग्रामपंचायत सदस्या देशमाने मॅडम, आदर्श विद्यालय शिरवळच्या मुख्याध्यापिका प्रमिला कदम, रयत




इंग्लिश मीडियम स्कूल शिरवळच्या मुख्याध्यापिका वर्षा मांढरे, पर्यवेक्षिका वासंती घाडगे उपस्थित होत्या. इयत्ता पहिली ते तिसरीच्या विद्यार्थ्यांसाठी बाल बाजार भरवण्यात आला होता. याचे वैशिष्ट्य म्हणजे बाल बाजारांमध्ये रोजच्या जीवनावश्यक वस्तूंबरोबरच संक्रांतीच्या ववसा आणि वाणाच्या वस्तूंचे खास आकर्षण होते. इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी विविध मनोरंजनात्मक खेळांचे आयोजन केलेले होते. त्यालाही खूप छान प्रतिसाद मिळाला. इयत्ता सहावी ते नववीच्या विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थ तयार करून उपस्थितांना खाद्यपदार्थांची मेजवानी दिली. या सर्वांमधून विद्यार्थ्यांना व्यवहार चातुर्य,पैशांची देवाण- घेवाण तसेच व्यावसायिक कौशल्य आत्मसात करणे असा उद्देश होता. असे शाळेच्या मुख्याध्यापिका वर्षा मांढरे यांनी सांगितले. यासाठी शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी सहभाग घेतला. पालकांचा या कार्यक्रमाला उदंड प्रतिसाद मिळाला.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# पिंपळगावच्या खंडोबाचा यात्रोत्सव भक्तिभावात; यळकोट यळकोट जय मल्हारच्या जयघोषात भंडारा-खोबऱ्याची उधळण

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, पारनेर (अहिल्यानगर) :** यळकोट यळकोट ऽऽऽ जय मल्हार च्या जयघोषात भंडारा-खोबऱ्याची मुक्त हस्ते उधळण करीत विविध धार्मिक कार्यक्रांनंतर पिंपळगाव रोठा (ता. पारनेर) येथील राज्यभरातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या कोरठण खंडोबा देवस्थानच्या ३ दिवसांच्या वार्षिक यात्रोत्सवाची बुधवार, दि १५ रोजी यात्रेच्या मुख्य व शेवटच्या दिवशी ब्राम्हणवाडा (ता. अकोले) व बेल्हे (जि.पुणे) येथील मानाच्या काठ्यांच्या मिरवणुकीनंतर या काठ्यांच्या हजारो भाविकांनी आपले नवस फेडून काठ्यांच्या देवदर्शन व कळस दर्शनानंतर इतर गावच्या मानाच्या काठ्यांच्या मिरवणुकीनंतर शांततेत व उत्साहात सांगता झाली यात्रेनिमित्त काही लाख भाविकांनी खंडोबाचे दर्शन घेतले.

खंडोबा यात्रा महोत्सव मोठ्या भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. पहाटेपासूनच दर्शनासाठी



**शासकीय महापूजा व महाआरती नंतर ब्राम्हणवाडा काठीने देवदर्शन तर बेल्हे काठीने कळस दर्शन घेतले. यानंतर इतर गावच्या मानाच्या काठ्यांच्या मिरवणूक पार पडल्या यात्रे दरम्यान मुंबई, ठाणे, नाशिक, नगर, संगमनेर, जुन्नर, अकोले येथील मोठ्या संख्येने भाविक कोरठणला आले होते. सर्वाधिक भाविक पुणे जिल्ह्यातून आले होते पोलिसांनी चोख पोलिस बंदोबस्त ठेवला होता. भाविकांच्या सोयीसाठी एस.टी कडून जादा गाड्या सोडण्यात आल्या होत्या. आरोग्य विभाग यांनी ही चोख व्यवस्था ठेवली होती.**

भाविकांच्या रांगा लागल्या होत्या सकाळी खंडोबाची चांदीची पालखी व अळकुटी, बेल्हे, कांदळी, माळवाडी, सावरगांव घुले कासारे कळस येथील मानाच्या पालख्यांची मंदिर प्रदक्षिणा मिरवणूक सुरू झाली.

ही मिरवणूक दुपारी मंदिरासमोर आल्यानंतर पालखी मानकर्यांचा देवस्थानकडून सन्मान करण्यात आला दु. १ वा. यात्रेचे मुख्य आकर्षण असलेल्या बेल्हे व ब्राम्हणवाडा येथील मानाच्या काठ्यांची शाही मिरवणूक सुरू झाली या मिरवणूकीत हजारो भाविकांची गर्दी झाली होती. दुपारी तीनच्या सुमारास दोन्ही काठ्या मंदिरासमोर आल्यानंतर पोलिस निरीक्षक समीर बारवकर यांच्या हस्ते काठ्यांची शासकीय महापुजा व महाआरती करण्यात आली.

या प्रसंगी देवस्थानच्या अध्यक्षा शालिनी घुले उपाध्यक्ष महेश शिरोळे, जेष्ठ विश्वस्त ॲड पांडुरंग गायकवाड तुकाराम जगताप, जालिंदर खोसे, राजेंद्र चौधरी, चंद्रभान ठुबे, सुरेश फापाळे, राम दास मुळे, धोंडीभाऊ जगताप, कमलेश घुले, अजित महांडुळे, सुवर्णा घाडगे, दिलीप घुले, महादेव पुंडे, माजी सरपंच अशोक घुले, सरपंच सुरेखा वाळुंज बाजार समितीचे सभापती बाबाजी तरटे, संजय वाघमारे, गोपीनाथ घुले, अमर गुंजाळ यांच्या सह हजारो भाविकांचा जनसागर उपस्थित होता.

# थोडक्यात

## रविवारी संत नामदेव, शिंपी समाजाचा वधू-वर, पालक परिचय मेळावा

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१६, विंचूर (नाशिक) :** नाशिक येथे नाशिक महानगर संत नामदेव महाराज शिंपी समाज सांस्कृतिक मंडळाच्या वतीने शिंपी समाजाचा १८ वा राज्यव्यापी वधू-वर, पालक परिचय मेळाव्याचे आयोजन रविवार, दिनांक १९ जानेवारी २०२५ रोजी तुपसाखरे लॉन्स येथे आयोजित करण्यात आला असून समाजाच्या सांस्कृतिक मंडळाच्या महिलांसाठी मकर संक्रांतीचे हळदीकुंकू व सांस्कृतिक कार्यक्रमाचे रविवार, दिनांक २६ जानेवारी २०२५ रोजी दुपारी २ ते रात्री ९ वाजेपर्यंत डान्स ग्रुप, फॅन्सी ड्रेस स्पर्धा व बक्षीस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या मेळाव्याला प्रमुख अतिथी म्हणून न्यायाधीश व ह.भ.प. चकोर श्रीकृष्ण बाविस्कर, मुंबई हायकोर्टाचे ज्येष्ठ वकील ॅड.विश्वनाथ टाळकुटे, रेडक्रॉस सोसायटीचे सचिव डॉ.सुनील औंधकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. समस्त शिंपी समाजातील पोटजातीतील इच्छुक वधू-वरांसाठी या भव्यदिव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. वधू-वर व पालकांनी यावेळी उपस्थित राहावे, असे आवाहन वृषाली तुपसाखरे, अतुल मानकर, राजेंद्र करमासे, अशोक कालेकर, शामसुंदर रहाणे, रमेश बकरे, प्रवीण पवार, रमेश चांडोले या पदाधिकाऱ्यांसह नाशिक महानगर नामदेव शिंपी सांस्कृतिक मंडळाच्या आयोजकांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ९३७३९ ०४५६१, ८८८३२१९२७ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा. या मेळाव्यात लाडकी लेक योजनेअंतर्गत वधू-वरांसाठी नोंदणी मोफत आहे.

# पेणच्या हाजरत पीर सय्यद बद्रुद्दीन शाहा हुसैनी चिश्ती(र.अ.)बाबांचा उरूस मोठ्या उत्साहात

**अक्षराज : मानसी कांबळे**

**दि.१६, खोपोली :** हाजरत पीर सय्यद बद्रुद्दीन शाहा हुसैनी चिश्ती(र.अ.)बाबांचा उरूस महोत्सव मोठ्या जल्लोषात मंगळवार दि.१४ ते १५ जनवरी २०२५ रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

गेल्या अनेक पिढ्यांपासून हा उर्स भक्तीभावाने साजरा केला जातो.यावेळी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उरुस काळात हिंदू-मुस्लिम ऐक्याचे दर्शन झाले.हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक असलेला पेणच्या हाजरत पीर सय्यद बद्रुद्दीन शाहा हुसैनी चिश्ती(र.अ.)बाबांचा उरूस मोठ्या उत्साहात साजरा झाला आहे.

रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यामध्ये डोंगर परिसरात वसलेल्या जंगलातील सर्वात मोठा उरुस भरवला जातो. या ठिकाणी महाराष्ट्रासह विविध राज्यातील सर्वधर्मीय भाविक या उरुसामध्ये सहभागी होत असतात.या उरुसाला मंगळवार पासून सुरुवात झाली असून या ठिकाणी सर्वधर्मीय भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी पाहिला मिळत आहे. पेण तालुक्यामध्ये हजरत पीर



सय्यद बद्रुद्दीन शाहा हुसैनी चिश्ती(र.अ.)बाबां यांची दर्गा डोंगर परिसरात वसलेल्या जंगलात आहे. या दर्गामध्ये गेल्या अनेक वर्षांपासून उरुस भरवला जातो. दरवर्षीनुसार यावर्षीही हा उरुस भरवण्यात आला आहे.

उरुसाची परिस्थिती लक्षात घेता यावर्षी पोलिसांनी या ठिकाणी तगडा बंदोबस्त केला असल्याचे दिसून आले. दर्ग्याच्या परिसरात फुले, चादर, अत्तर सुगंध, टोपीची दुकाने तसेच लहान मुलांनाचे खेळणी,कपडे ,जिलेबी मिठाई,हलवा पराठे,हॉटेल,टीस्टोल,इतर, मुलांना खेळणारे जमपिंग जिपाक,रेलगाडी,आकाश पालनेला रोषणाई करीत यांसह आदी दुकाने लावण्यात आली होती. उरूसाच्या निमित्ताने दर्गेला करण्यात आलेली विद्युत रोषणाई ही भाविकांना आकर्षित करणारी ठरत आहे. तसेच रात्री ग्यारवीशरीफ कार्यक्रम नंतर संदलची मिवडणूक काढून दर्गातील मजारला अर्पण करण्यात आले.जियारत साठी आलेल्या भाविकांनानी गिलाफ,गुलाब,फुलांची चादर,मजारला अर्पण करीत नियाज वाटप करण्यात आली.जीआरत साठी येणाऱ्या भाविकांना जेवणची लंगर (नियाज) उत्तम सोय करण्यात आली होती.सर्व धार्मिक विधींसाठी दर्गा कमिटी मजावर,मुस्लिम बांधव व मौलवी यांची उपस्थिती होती. बाबांच्या दर्ग्यांवर आपले संकट दूर होण्यासाठी विविध मन्नती केल्या जातात व त्या पूर्ण होतात,अश्या विश्वासाने मन्नती केल्या जातात. मन्नती पूर्ण झालेकी भाविक आपल्या कुटूंबा सबत जागो जागो नियाज (जेवण ) बनून वाटप करण्यात येते .गरीब गरजू लोकांना सदका खैरात दान करीत त्यांची मदत करण्यात येते.अशी भाविकांची श्रध्दा असल्याने दरवर्षी उर्सला भाविकांची मोठी उपस्थिती असते.

## भव्य लोकजागर व सन्मान सोहळा उत्साहात संपन्न

**अक्षराज : सौरभ कामडी**

**दि.१९, मोखाडा (पालघर) :** वाकडपाडा ता.मोखाडा येथे आदिवासी विकास हक्क संघर्ष समिती च्या वतीने आयोजित केलेल्या लोकजागर व समाजातील गुणवंतांचा सत्कार समारंभ कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी जिल्हा परिषद शाळा वाकडपाडा येथे नवीन बांधण्यात आलेल्या स्टेज ला माजी आदिवासी विकास मंत्री व आदिवासी समाजाचे नेते निसर्गवासी वंदनीय मधुकरराव पिचड साहेब सांस्कृतिक कला मंच नामकरण करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी प्रदीप वाघ होते. तर प्रमुख वक्ते म्हणून भरत गारे गुरूजी, प्रियंका मेंरदे यांनी आदिवासी समाज संस्कृती व आद्य क्रांतिकारकांच्या जीवनावर मार्गदर्शन केले. तसेच लोकजागर कार्यक्रमात आदिवासी समाजाचे लोकप्रिय गायक संदीप गवारी व मनोज गांगुर्डे यांनी आदिवासी गीतांच्या माध्यमातून समाज जागृती केली. या कार्यक्रमात आदिवासी समाजाती आदर्श व गुणवंतांचा समाज भूषण पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रल्हाद काका कदम, डॉ.मिठाराम कडव, पंचायत समितीच्या सदस्या आशा झुगरे, एकनाथ दरोडा, प्रभाकर पाटील, परीसरातील सरपंच, उपसरपंच, पत्रकार व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंगेश दाते, संजय वाघ यांनी केले तर आभार प्रदर्शन विठ्ठल गोडे व सूत्रसंचालन अभिनया वाघ हिने केले.

# चिंचपोकळी सार्वजनिक उत्सव मंडळ आयोजित चिंतामणी चषक - २०२५ कबड्डी स्पर्धा

**अक्षराज : संदिप येवले**

**दि.१६, मुंबई :** लायन्स स्पोर्टस्, विजय क्लब, शिवशक्ती क्रीडा यांनी चिंचपोकळी सार्वजनिक उत्सव मंडळाने आयोजित केलेल्या ७व्या चिंतामणी चषक कबड्डी स्पर्धेच्या प्रथम श्रेणी पुरुष गटात, तर हिंदमाता सेवा, वीर संताजी क्रीडा, शिवनेरी सेवा यांनी कुमार गटात विजयी सलामी दिली. मुंबई येथील चिंचपोकळी लोहमार्ग स्थानका जवळील सदगुरू भालचंद्र महाराज क्रीडांगणावर झालेल्या प्रथम श्रेणी पुरुषांच्या उद्घाटन सामन्यात लायन्स स्पोर्टस् ने सूर्यकांत व्यायाम शाळेचा प्रतिकार २७-२१ असा मोडून काढला.

हर्ष मोरे, शुभम मटकर, यश सायगावकर यांच्या चढाई पकडी च्या खेळाच्या जोरावर पूर्वार्धात लोण देत १६-०५ अशी भक्कम आघाडी लायन्सने घेतली. उत्तरार्धात सूर्यकांतच्या साहिल तूपारे, मंदार ठोंबरे यांनी आपला खेळ गतिमान करीत लायन्स संघावर लोण देत ही आघाडी कमी केली. पण वेळेचे गणित साधता न आल्याने त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. दुसऱ्या सामन्यात विजय क्लबने साऊथ कॅनरा



स्पोर्टस् चा ३२-२२ असा पाडाव केला. विश्रांतीला १७-०९ अशी विजय क्लब कडे आघाडी होती. रोहन तिवारी, निखिल शेट्टी यांच्या दमदार चढाया त्याला शुभम रहाटे, आयुष साळवी यांची मिळालेली पकडीची साथ यामुळे हे शक्य झाले. साऊथ कॅनराच्या अमन शेख, करण गरजे यांनी विश्रांतीनंतर बऱ्यापैकी लढत दिली.

याच गटात शिवशक्ती क्रीडा मंडळाने चुरशीच्या लढतीत विजय नवनाथचे आव्हान ३७-३३ असे संपविले. मध्यांतराला १६-११ अशी शिवशक्ती कडे आघाडी होती. साई चौगुले, वैष्णव सूर्यवंशी, विराज सोहनी शिवशक्ती कडून, तर मयूर खामकर, धीरज मेघे विजय नवनाथ कडून उत्कृष्ट खेळले. कुमार गटाच्या अत्यंत अतितटीने खेळल्या लढतीत स्थानिक हिंदमाता सेवा मंडळाने वीर नेताजी मंडळाचे कडवे आव्हान ३४-३३ असे मोडून काढले. पहिल्या डावात वीर नेताजीने आदित्य चव्हाण, ओम् गावडे, आदित्य मोरे यांच्या संयमी खेळाच्या बळावर हिंदमाता वर लोण देत १९-१६ अशी आघाडी घेतली होती. दुसऱ्या डावात हिंदमाताच्या विजय गोरे, वैभव शिंदे, विनीत कनोजिया यांनी कल्पक खेळ करीत सामन्याच्या शेवटच्या क्षणी सामना एका गुणाने आपल्या नावे केला. या सामन्यात हिंदमाताने ३ अव्वल पकड केल्या. दुसऱ्या सामन्यात वीर संताजीने संस्कृती प्रतिष्ठानला ४१-३७ असे चकविले. पूर्वार्धात दोन्ही संघ २३-२३ अशा बरोबरीत होते. पूर्ण डावात वीर संताजीने ९ बोनस गुण व ४ अवल पकड करीत ८गुण वसूल केले. संस्कृतीने एक लोण व ५ बोनस गुण घेतले. पण ४ केलेल्या अव्वल पकडी मुळे वीर संताजीची सरशी झाली. अनिकेत पिंपरे, प्रणव जाधव वीर संताजी कडून, तर मनोज गोरे, अन्सारी संस्कृती कडून उत्कृष्ट खेळले. याच गटात शिवनेरी सेवा मंडळाने दुर्गामाता स्पोर्टस् ला ३५-२३ असे नमवित आगेकूच केली. सुशील, प्रिन्स डिसोझा शिवनेरी कडून, तर सुयश जाधव, यश मोने दुर्गामाता कडून उत्तम खेळले.

या स्पर्धेत उद्घाटन लोहमार्ग पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांच्या शुभहस्ते झाले. तदप्रसंगी मंडळाचे अध्यक्ष विठ्ठलदास पै, सचिव वासुदेव सावंत, कोषाध्यक्ष विकास सावंत, प्रवीण राणे, विद्याधर घाडी आदी मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेस काळाचौकी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मनीष श्रीधनकर, मुंबई शहर कबड्डी असो.चे सचिव विश्वास मोरे, कबड्डीतील शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त राजेश पाडावे यांनी सदिच्छा भेट दिली.

## हजारो विद्यार्थ्यांनी घेतली भारतीय हवाई दलातील विमानांची अनुभूती

**अक्षराज : साहेबराव जाधव**

**दि.१५, नांदेड :** मिग-२१, जॅग्वार, मिराज-२०००, मिग-२९, सुखोई-३०, तेजस व रायफल यांसह उडता मासा व उरी या चित्रपटात शत्रूच्या जागेची रेकी करण्यासाठी वापरण्यात आलेल्या गरुड पक्षाची प्रतिकृती उडवीत एरोमॉडलिंग शो च्या माध्यमांतून हवाई दलातील फायटर्सची माहिती व विमान विद्येची अनुभूती बुधवार, दिनांक १५ जानेवारी २०२५ रोजी सगरोळी ता.बिलोली येथील राजर्षी श्री छत्रपती शाहू सैनिकी विद्यालयाच्या प्रांगणात परिसरातील हजारो विद्यार्थ्यांनी घेतली.

राष्ट्रीय थलसेना दिनी येथील सैनिकी विद्यालयाने विविध कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी एरोमॉडलिंग शो हे विद्यार्थी, पालक व नागरिकांचे आकर्षण ठरले. भारतीय हवाई दलातील एकापेक्षा एक असलेल्या विमानांच्या प्रतिकृतीरेडिओ कंट्रोलद्वारे उडवून चित्तथरारक कवायतींचे प्रात्याक्षिके दाखविली. प्रख्यात विमान छंदिष्ट सदानंद काळे व विक्रमवीर रेडीओ कंट्रोल एरो मॉडेल अथर्व काळे यांनी भारतीय हवाई दलातील विविध प्रकारचे विमान तयार करून हजारो शोच्या माध्यमातून माहिती व विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली आहे. हा एरोमॉडलिंग शो सैनिकी विद्यालयाने इतर विद्यार्थ्यांना देखील अनुभवायास मिळावा यासाठी परिसरातील प्रशालेतील विद्यार्थ्यांना निमंत्रित केले होते. विमानांच्या चित्तथरारक कवायती प्रसंगी हजारो विद्यार्थ्यांच्या भारतमातेच्या जयघोषानं आसमंतात निनादला होता. कार्यक्रमासाठी चाकूर येथील बीएसएफचे महासंचालक विपीन कुमार हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी त्यांनी, डिवोशन, डेडीकेशन व डिटरमिनेशन ह्या गुणांनी एक चांगला नागरिक बनतो. देशरक्षणासाठी सैनिकांमध्ये ह्या गुणांची आवश्यकता असल्याचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना म्हणाले. सैनिकी विद्यालयातील उपक्रमांची स्तुती देखील केली. विपीन कुमार यांना मानवंदना देण्यात आली. सैनिकी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उपस्थितांसमोर अश्वारूढ चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर करून वाहवा मिळविली. एरोमॉडलिंग शो मधून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यात आले. मुलांमध्ये भारतीय सैन्याबद्दल अभिमान व राष्ट्रसेवेसाठी काम करण्याची प्रेरणा मिळाली.

# मुदखेड शहरात बांधकाम चालू असलेल्या जलकुभांचे काम संथगतीने चालू

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१६, मुदखेड (नांदेड ) :** मुदखेड शहरात महाराष्ट्र सुवर्ण जयंती नागरोत्थान योजनेअंतर्गत एकेचाळीस कोटींची कायमस्वरूपी पाणीपुरवठा योजना मंजूर चार वर्षे उलटून गेले असले तरी सदरील योजनेचे काम अत्यंत संथगतीने तसेच निकृष्ट दर्जाचे होत असल्याने संबंधित योजनेच्या कामाची तक्रार थेट मुख्यमंत्री कार्यालयात करण्यात आली आहे. संबंधित पाणीपुरवठा योजनेचा बोजवारा वाजला असून काम निकृष्ट व दर्जाहीन असल्याने यातून आता भ्रष्टाचाराचे पाणी टपकणार का? असा सवाल तक्रारदार काँग्रेस शहराध्यक्ष कैलास गोडसे यांनी दिली आहे. मुदखेड शहराला कायमस्वरूपी पाणीपुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नागरोत्थान योजनेअंतर्गत सन २०२१ मध्ये मंजूर करण्यात आली होती. या योजनेतून शहरातील नागरिकांना स्वच्छ व शुद्ध पाणीपुरवठा मिळावा असा होता . संबंधित योजनेचे काम प्रगती कन्स्ट्रक्शन मे. लातूर यांना देण्यात आले होते. याद्वारे बळेगावच्या बंधाऱ्यावरून नवीन विहीर खोदून पाणीपुरवठा करण्यात येणार होता. चार वर्षात अजूनही नवीन विहीर खोदली नसल्याने जुन्याच विहिरीला नवी विहीर दाखवून पाणीपुरवठा करण्यात येणार आहे का ? अशी चर्चा आहे. या योजनेअंतर्गत शहरातील नव्याने उभारण्यात आलेल्या कोट्यवधीं रुपयाच्या रस्त्यांची तोडफोड केल्याने रस्ते उखडले आहेत. पाणीपुरवठा योजनेच्या पाईपलाईनचे खोदकामही अंदाजपत्रकानुसार केले जात नसून थातुरमातुर केले जात असल्याने योजनेची त्रस्त तांत्रिक लेखापरीक्षण करण्याची मागणीही काँग्रेस शहराध्यक्ष कैलास गोडसे यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे केली. मागच्या चार वर्षापासून मुदखेड शहरातील नागरिक शुद्ध व पर्याप्त पिण्याच्या पाण्याची वाट पाहत असताना योजनेचाच बोजवारा वाजला असल्याने ४१ कोटी रुपयांच्या पाणीपुरवठा योजनेत दर्जाहीन व निकृष्ट कामे झाल्याने संपूर्ण योजनेच्या चौकशीची मागणी काँग्रेस शहराध्यक्ष कैलास गोडसे थेट मुख्यमंत्री यांच्याकडे केली असल्याने या योजनेतून भ्रष्टाचाराचे तर पाणी टपकणार नाही ना? असेच आता बोलले जात आहे.

## महाराष्ट्रातील आयटीआयचे नामकरण यशस्वी

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१६, ठाणे :** कॅबिनेट मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या पुढाकारामुळे महाराष्ट्रातील १३२ शासकीय औद्योगिक संस्थांचे नामकरण यशस्वी पणे करण्यात आले आहे. प्रथम १४ शासकीय औद्योगिक संस्थांचे नामकरण करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाद्वारे घेण्यात आला होता. महाराष्ट्रातील फक्त २ औद्योगिक संस्था सोडल्या तर इतर औद्योगिक संस्थांना या आधी कोणत्याही प्रकारची नावे नव्हती. त्यांनतर कौशल्य विकास विभागाद्वारे महाराष्ट्रातील शासकीय औद्योगिक संस्थांसाठी नागरिकांकडून नावाबाबत सूचना मागवण्यात आल्या होत्या. त्याप्रमाणे राज्यातील १३२ आयटीआयचे नामकरण करण्याचा निर्णय आज जाहीर करण्यात आला.त्यानुसार अकोला, अमरावती, कोल्हापूर, गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, जालना, धाराशिव, धुळे, नंदुरबार, नागपूर, नांदेड, नाशिक, परभणी, बीड, बुलढाणा, भंडारा, मुंबई उपनगर, यवतमाळ, रत्नागिरी, रायगड, लातूर, वर्धा, वाशिम, सांगली, सातारा, सोलापूर आणि हिंगोली जिल्ह्यातील शासकीय औद्योगिक संस्थांना नवीन ओळख मिळाली.